Financial Express
28.06.2017

# PUDUMJEE INDUSTRIES LTD.

**Registered Office:** Thergaon, Pune 411033.
**CIN:** L74999MH1999PLC013394
**Ph:** 020 40773333; **Fax:** 020 40773388 **E-mail:** sk@pudumjee.com
**Website:** www.pudumjeeindustries.com

## NOTICE OF ANNUAL GENERAL MEETING, E-VOTING AND BOOK CLOSURE DATE

Notice is hereby given that the 52nd Annual General Meeting (AGM) of the Company will be held on Monday, the 24th day of July, 2017 at the Registered Office of the Company at Thergaon, Pune - 411033 at 10.00 a.m. (ST) to transact the business as set out in the Notice dated 23rd May, 2017 which has already been sent on 27th June, 2017 along with Audited Financial Statements for the year ended 31st March, 2017 and Reports of Directors' and Auditors thereon electronically to those members who have registered their email addresses and physically to all those members who have not registered their email addresses or requested for hard copy. The Notice of Annual General Meeting/Annual Report of the Company are available on the Company's website at www.pudumjeeindustries.com and is also available for inspection at the Registered Office of the Company on any working day between office hours. The Notice of AGM is also available on Central Depository Services (India) Limited (CDSL) at their website www.cdslindia.com.

A MEMBER OF A COMPANY ENTITLED TO ATTEND AND VOTE IS ENTITLED TO APPOINT A PROXY TO ATTEND AND VOTE INSTEAD OF HIMSELF AND THE PROXY NEED NOT BE MEMBER OF THE COMPANY.

Pursuant to provisions of section 91 of the Companies Act, 2013, read with Rule 10 of Companies (Management and Administration) Rules, 2014 and Regulation 42 of Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 Notice is also hereby given that the Register of Members and Share Transfer Books of the Company will remain closed from Wednesday 12th day of July, 2017 to Monday, the 24th day of July, 2017, both days inclusive, for the purpose of Annual General Meeting.

In compliance with Section 108 of the Companies Act, 2013 and Rule 20 of the Companies (Management and Administration) Rules, 2014, as amended, and Regulation 44 of Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 the members are provided with the facility to cast their votes electronically through e-voting services provided by Central Depository Services (India) Limited (CDSL) on all resolutions set forth in the notice of 52nd Annual General Meeting. The instructions for remote e-voting are given in the Notice of AGM.

The Company will make necessary arrangement to issue the Ballot Papers at the AGM venue for exercising the option of voting by the members of the Company. The members who have caste their votes by remote e-voting may also be entitled to attend the meeting but shall not be entitled to cast their votes again.

Any person who becomes a member of the Company after the date of dispatch of Notice and hold shares on cut-off date i.e. 17th July, 2017 and whose PAN is not updated may obtain login id and Password from M/s. Satellite Corporate Services Private Limited, RTA of the Company by sending request at service@satellitecorporate.com.

Mr. P. N. Parikh and failing him Mr. Mitesh Dhabliwala of Parikh & Associates, Practicing Company Secretaries has been appointed as Scrutinizer to scrutinize voting process in fair and transparent manner.

**Instructions for remote e-voting:**

i) Commencement of Remote e-voting : Friday, 21st July, 2017 [9.00 a.m.(ST)]
   End of Remote e-voting : Sunday, 23rd July, 2017 [5.00 p.m.(ST)]

ii) Cut-Off date : 17th July, 2017

iii) If you are already registered with CDSL, you can use your existing User id and Password to cast your vote.

iv) Members whose name is recorded in the Register of Members or in the Register of Beneficial Owners maintained by the Depositories as on the cut-off date shall be entitled to avail the facility of Remote e-voting / Voting in General Meeting as the case may be.

v) The Remote e-voting module shall be disabled for voting after 5.00 p.m. on Sunday, 23rd July, 2017.

vi) In case of grievance regarding remote e-voting members are requested to refer the Frequently Asked Questions (FAQ's) and e-voting manual available at www.evotingindia.co.in under help section or write email to helpdesk at evoting@cdslindia.com.

For PUDUMJEE INDUSTRIES LTD.,
Sd/-
(J. W. Patil)
Company Secretary

Place : Pune
Dated : 28th June, 2017

Loksatta 28.06.2017

# पदमजी इंडस्ट्रीज लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : थेरगाव, पुणे- ४११ ०३३.
सीआयएनः एल ७४९९९ एमएच १९९९ पीएलसी ०१३३९४
फोनः ०२०-४०७७ ३३३३, फॅक्सः ०२०-४०७७ ३३८८
ईमेलः sk@pudumjee.com, वेबसाईटः www.pudumjeeindustries.com

## वार्षिक सर्वसाधारण सभेची व इ-मतदानाची सूचना आणि बुक क्लोजरची तारीख

याद्वारे सर्वांना सूचना (नोटीस) देण्यात येते की, मे. पदमजी इंडस्ट्रीज लि. या कंपनीची ५२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (AGM) सोमवार, दि. २४ जुलै २०१७ रोजी कंपनीचे थेरगाव, पुणे ४११ ०३३ येथील नोंदणीकृत कार्यालय येथे सकाळी १०.०० (भारतीय प्रमाण वेळेनुसार) आयोजित केली आहे. या बैठकीमध्ये, दि. २३ मे २०१७ रोजीच्या सूचनेत दिलेले कामकाज होईल. ही सूचना आणि त्यासोबत ३१ मार्च २०१७ रोजी संपलेल्या वर्षाचे लेखापरीक्षण केलेली वित्तीय विवरणपत्रे आणि संचालकांचा व लेखापरीक्षकांचा अहवाल ही कागदपत्रे दि. २७ जून २०१७रोजी ज्या सदस्यांनी त्यांचे इमेल कंपनीकडे नोंदले आहेत त्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविली आहेत. तसेच ज्या सदस्यांनी त्यांचे इ-मेल पत्ते नोंदलेले नाहीत किंवा हार्ड कॉपीसाठी विनंती केली आहे त्यांना प्रत्यक्ष स्वरुपात ही कागदपत्रे पाठविण्यात आलेली आहेत. कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना/ कंपनीचा वार्षिक अहवाल कंपनीची वेबसाईट www.pudumjeeindustries.com येथे उपलब्ध आहे. तसेच कंपनीचे नोंदणीकृत कार्यालयात कोणत्याही कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत निरीक्षणासाठी ही कागदपत्रे उपलब्ध करून दिली जातील. याशिवाय वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) (CDSL) यांची वेबसाईट www.cdsindia.com येथेसुद्धा उपलब्ध आहे.

**कंपनीच्या कोणत्याही सदस्याला उपस्थित राहण्याचा आणि मतदान करण्याचा हक्क आहे. तसेच त्याच्या वतीने बदली व्यक्तीला उपस्थित राहण्यासाठी व मतदान करण्यासाठी नियुक्त करण्याचा अधिकार आहे आणि ही बदली व्यक्ती कंपनीची सदस्यच असण्याची आवश्यकता नाही.**

कंपनी कायदा २०१३ चे कलम ९१ मधील तरतुदी, ज्यांचे सहवाचन कंपन्यांचे (व्यवस्थापन व प्रशासन) नियमावली २०१४ यातील नियम क्र. १० सोबत आणि सिक्युरिटीज ॲण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया यांची नियमने २०१५ यातील नियमन क्र. ४२ (बंधने व प्रकटने यांच्या नोंदणीच्या आवश्यकता) यांचे सोबत होते त्यानुसार, याद्वारे सूचना देण्यात येते की, वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कारणास्तव कंपनीचे रजिस्टर ऑफ मेंबर्स व शेअर ट्रान्सफर बुक्स ही बुधवार, दि. १२ जुलै २०१७ ते सोमवार, दि. २४ जुलै २०१७ या कालावधीमध्ये (दोन्ही दिवसांसह समाविष्ट) बंद ठेवण्यात येतील.

कंपनी कायदा २०१३ चे कलम १०८ आणि कंपन्यांचे (व्यवस्थापन व प्रशासन) नियमावली २०१४- दुरुस्ती केल्याप्रमाणे तसेच सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (बंधन व प्रकटने यांच्या नोंदणीच्या आवश्यकता) नियमने २०१५ यातील नियमन क्र. ४४ यांची पूर्तता करण्यासाठी सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (CDSL) यांनी पुरविलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान सेवेमार्फत (ई-व्होटिंग) ५२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत दिलेल्या सर्व ठरावांवर सर्व सदस्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्याची सेवा उपलब्ध आहे. दूरवरून इ-मतदान करण्याच्या सूचना वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत दिल्या आहेत.

कंपनीच्या सदस्यांना वार्षिक सर्वसाधारण सभेच्या जागी त्यांच्या मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी मतपत्रिका देण्यासाठी आवश्यक ती सर्व व्यवस्था कंपनीतर्फे करण्यात येईल. ज्या सदस्यांनी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने दूरवरून मतदान केले आहे (रिमोट इ-व्होटिंग) त्यांनासुद्धा सभेत उपस्थित राहता येईल. मात्र त्यांना पुनः सभेत मतदान करता येणार नाही.

जी कुणी व्यक्ती सूचना पाठविल्यानंतर कंपनीची सदस्य झाली असेल आणि अंतिम (कट ऑफ) तारखेला म्हणजे दि. १७ जुलै २०१७ रोजी शेअर्स धारण करीत असेल तसेच ज्या व्यक्तीचे पॅनकार्डचे अद्यावतीकरण झाले नसेल त्यांनी मे. सॅटेलाइट कार्पोरेट सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, कंपनीचे आरटीए यांचेकडे service@satellitecorporate.com येथे विनंतीपत्र पाठवून लॉग-इन आयडी आणि पासवर्ड मिळवावा.

मतदानाची प्रक्रिया योग्यपणे आणि पारदर्शक पद्धतीने व्हावी यासाठी मतदानावर लक्ष ठेवणे व छाननी करणे या कामाकरिता पारीख ॲंड. असोसिएट्स, व्यावसायिक कंपनी सेक्रेटरी यांचे श्री. पी. एन. पारीख यांची तसेच ते नसल्यास श्री. मितेश धाबीवाला यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

दूरवरून इ-मतदान करण्यासाठी सूचना

| | |
|---|---|
| १) दूरवरून (रिमोट-इ-व्होटींग) इ-मतदानाचा प्रारंभ होणे | : शुक्रवार, दि. २१ जुलै २०१७ (सकाळी ९.०० वाजेपासून (भारतीय प्रमाण वेळ) |
| दूरवरून इ-मतदान समाप्त होणे | : रविवार, दि. २३ जुलै २०१७ (सायंकाळी ०५.०० वाजता (भारतीय प्रमाण वेळ) |
| २) अंतिम (कटऑफ) तारीख | : १७ जुलै २०१७ |

३) जर आपण यापूर्वीच सीडीएसएल यांचेकडे नोंदणी केली असेल तर आपण आपले मत देण्याचा विद्यमान युजर आयडी आणि पासवर्ड यांचा वापर करू शकता.

४) ज्या सदस्यांची नावे ''रजिस्टर ऑफ मेंबर्स'' यामध्ये किंवा 'रजिस्टर ऑफ बेनेफिशियल ओनर्स या डिपॉझिटरीज यांनी जतन केलेल्या नोंदवह्यात अंतिम तारखेला (कटऑफ डेट) पर्यंत नोंदलेली असतील त्यांना दूरवरून इ-मतदान/ सर्वसाधारण सभेत प्रत्यक्ष मतदान करणे यापैकी जे असेल त्याप्रकारे मतदान करण्याच्या सोयीचा वापर करण्याचा अधिकार आहे.

५) रविवार, दि. २३ जुलै २०१७ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेनंतर दूरवरून इ-मतदान करण्याची सुविधा बंद करण्यात येईल.

६) दूरवरून इ-मतदान करण्याबाबत सदस्यांना काही अडचणी येत असल्यास त्यांनी नेहमी विचारले जाणारे प्रश्न (FAQS) आणि इ-मतदानाची माहिती पुस्तिका (मॅन्युएल) यांची मदत घ्यावी या दोन्ही सुविधा www.evotingindia.co यामधील हेल्प सेक्शनमध्ये उपलब्ध आहेत. किंवा त्यांनी evoting@cdsindia.com येथील हेल्पडेस्क यांना इ-मेल पाठवावी.

पदमजी इंडस्ट्रीज लि. करिता
सही/-
(जे. डब्ल्यू. पाटील)
कंपनी सेक्रेटरी

स्थळ : पुणे
दिनांक : २८ जून २०१७

...फोनी - ६७२४१०००. फॅक्स - ६७२४११८७ ● लोकसत्ता कार्यालय : दुसरा मजला, एक्स्प्रेस टॉवर्स, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१.
...गर ०२४१- २४५११०७, फॅक्स -२४५१६०७. कोल्हापूर ०२३१- २६४४११४.
...शिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.